**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक २ चा पुढील सरतपास .
प्रतिवादीतर्फे वकिल श्री प्रसाद यांचेमार्फत**

१ मी सदर प्रकरणात माझे शपथपत्र दाखल केलेले असून त्यातील मजकूर माझया सांगण्याप्रामणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तो मजकूर मी स्वत: वाचलेला आहे. आता मला नि.१२२ विक्रीपत्र दाखविले त्यावर माझा अंगठा आहे व माझे वडिलांनी देखील त्यावर अंगठा केला होता. सदर विक्रीपत्रावर घेणार म्हणून श्री ठाकरे यांनी सही केली होती व साक्षीदार म्हणुन अरूण गोरले व भाकरे यांनी सही केली होती.

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री गायकवाड**

२ मी व वादी कचरू भाउ आहोत. मला यशोदा व बिंदा या दोन बहीनी आहेत. मी, वादी व आमच्य दोन बहीनी हे वासुदेव यांचे मुले आहोत. माझी आई भुलाबाई ही अंदाजे १०-१५ वर्षोपुर्वी मरण पावली असेल. माझी आई भुलाबाई ही वादी कचरू याचेकडे राहण्यास होती. माझे वडिल वासुदेव हे माझयाकडे राहत होते. मी मोठा भाउ आहे. माझे वडिल वासुदेव हे त्यांच्या मृत्यूपुर्वी १०-१५ वर्षे माझयाकडे राहत होते. हे म्हणने खरे आहे की, आई भुलाबाई ही १०-१५ वर्षे पासून वादी कचरू याचेकडे राहण्यास होती. हे म्हणने खरे आहे की, माझे लग्न वडिल मरण्यापुर्वी २०-२५ वर्षे अगोदर झाले व मी आपल्या कुटुंबात वेगळा राहतो. हे म्हणने खरे आहे की, वडिल मरण्या अगोदर २५ वर्षोपुर्वी वादी कचरू याचे लग्न झाले. हे म्हणने खरे आहे की, कचरू देखील लग्न झाल्यापासून कुटुंबात वेगळा राहतो. वादी कचरू याने हा दावा दाखल केल्यानंतर माझे वडिल वासुदेव मयत झाले. हे म्हणने खरे आहे की, माझे वडिल मयत झाल्यानंतर अंबाडी येथील सर्व्हे न.५६ या शेतावर माझे

भाउ कचरू तसेच दोन बहीनी अशांचे नावे वारस म्हणुन सात बारावर लागले होते. हे म्हणने खरे आहे की, गट न.५६ यावर आमचे बहीनीचा हक्क सोडल्याबाबत हक्कसोड लेख मी व कचरू यांनी लिहुन घेतला होता. सदर हक्कसोड लेख हा सह निबंधक, कुही यांचे कार्यालयात नोंदणीकृत केला होता.

कोर्टाची वेळ संपल्यामुळे उलटतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत

( प्रशांत कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुही.

दिनांक २४/०१/२०१७